# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी pwd@mbmc.gov.in

// बांधकाम / विद्युत विभाग //


जा.नं.मनपा/साबां/वि/२२७८/२०२६-२७

दि. २५/ ६ /२०२६

**प्रति,**

**१) जनसंपर्क अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**२) सिस्टीम मॅनेजर**
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :** वृत्तपत्र व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिर नोटिस प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील भाईंदर पश्चिम गावदेवी मार्ग श्री. दुर्गा पराडकर भवन को. ऑप. हौ.सो. लि. प्रस्तावित रस्त्याची रुंदी १२ मी. एवढी ठेवून दोन्ही बाजुची रस्त्याच्या रेषा विहीत करणे आक्षेपाबाबत सोबत जाहिर नोटिस देण्यात येत असून सदरची जाहिर नोटिस महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावी. सदर जाहिर नोटिस हे पत्र मिळाल्यापासुन दोन दिवसात वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

25 वर्षे
विकासाची
मिरा भाईंदर महानगरपालिका
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

**बांधकाम / विद्युत विभाग**

पुण्यश्लोक 300

जा.नं. मनपा/साबां/वि./२२७८/२०२६-२७.  दि.२५/६/2026

## // जाहिर नोटीस //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) गावदेवी मार्ग श्री दुर्गा पराडकर भवन को.ऑप.हौ.सो.लि. हा सार्वजनिक वहिवाटीचा व सार्वजनिक वापराचा रस्ता उपलब्ध आहे. सदर रस्त्याच्या दुतर्फा इमारती बांधकामे असून सदर रस्त्याची रुंदी ही एकसमान नाहीत. सदर रस्त्याची रुंदी ही भाईंदर (प.) गावदेवी मार्ग श्री दुर्गा पराडकर भवन को.ऑप.हा.सो.लि. पर्यंत एकसमान असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 210 अन्वये आयुक्त यांना मा. स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने कोणत्याही सार्वजनिक रस्त्याच्या एका किंवा दोन्ही बाजूच्या रेषा विहीत करण्याचा अधिकार आहे. त्या अधिकारात सदर प्रस्तावित रस्त्याची रुंदी ही 12 मी एवढी ठेवून दोन्ही बाजूतील रस्त्याच्या रेषा विहीत करावयाच्या आहेत. सदर प्रस्तावाबाबत काही आक्षेप असल्यास सदर लेखी आक्षेप कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम / विद्युत विभाग) चौथा मजला मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता.जि. ठाणे 401101 यांचे कार्यालयात दि. 29/07/2026 पर्यंत सादर करण्यात यावे. सदर रस्त्याचा नकाशा व अधिक माहिती या विभागाकडे कार्यालयीन कामाच्या दिवशी व वेळेत पहावयास मिळेल. तद्नंतर असलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-14/2026-27/NM/L-145